

# महानगर


मलिका अमर शेख



SACHIN KETKAR

# महानगर

सचिन केतकर
मुंबई २५/५/०५



र!

महानगर ख

कवितासंग्रह

Mahanagar
Poetry
Collection

मलिका अमर शेख

प्रकाशक : नामदेव ढसाळ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी

संपर्क :
४०४/बी, फ्लोरिडा, शास्त्री नगर,
मुंबई ४०० ०५३.

मूल्य : ७० रुपये

प्रकाशन : मार्च १९९९

मांडणी व चित्रे :
प्रदीप म्हापसेकर, नामदेव ढसाळ,
मलिका अमरशेख, आशुतोष ढसाळ
हेनिंग स्टेगम्युलर

मुखपृष्ठ : नामदेव ढसाळ

मुद्रक : ॐ प्रिंट, वरळी, मुंबई ४०० ०२५.

# महानगर

SACHIN C. KETKAR
Professor
Department of English
Faculty of Arts
The M. S. University of Baroda
Vadodara - 390 002.

या महानगरानं सगळंच दिलं
माझ्या अस्तित्वाला
त्या महानगरालाच भेट हे शब्दांचं नगर!

## मलिका अमरशेख

## महानगर – १



एक पूर्ण स्त्री
गर्भाशयासकट

एक पूर्ण पावसाळा
एक पूर्ण ग्रीष्म
एक आभाळ आणि एक किनारा

तिच्या छातीत न् मांड्यात तुम्ही जगाचे अर्थ शोधता
किंवा तुमच्या प्रश्नांची उत्तरं
किंवा थोडा टाईमपास किंवा चेंज
पत्नी रखेल आणि वेश्या


काय फरक असतो यात?
फक्त संख्येचा...

पण तिघीत शरीराहून अधिक काहीतरी असतंच
जे तुम्ही समजून उमजून नाकारताय्...
खरंच बिछाना हेच साऱ्या प्रश्नांचं उत्तर आहे काय?
की ती एक प्रतिक्षिप्त क्रिया झालीय?
संभोग करून पाठ फिरवून झोपल्यावर
तुम्हाला हेही माहीत नसतं की
शेजारी स्त्री आहे की स्मशान की शेण
अशा परिस्थितीतही



तुम्ही कवितेबद्दल बोलता याचं मला सखेद आश्चर्य वाटतंय.
हे शब्दबंबाळ जगणं
हे खोटे मुकूट
ही भावनांची खेळणी तुम्हाला कुठवर पुरणार?
स्त्रीच्या मांड्यांना वळसा घालून
तुमच्या बोटी कुठल्यातरी ध्येयाकडे शीड उभारून जातात
गर्भाशयाचा रूमाल उडवत त्या पुटपुटतात
''बिचाऱ्याला त्याचं बेट सापडू दे''
मग त्या पुन्हा तिसरा किनारा होतात
किंवा तुम्ही त्यांच्या स्तनाग्रावर उतरता
न् ''अमेरिका सापडली'' युरेका, युरेका!
असलं काहीतरी ओरडता
तिच्या केसांचा समुद्र वाहता
तुमची शरीरं तिच्या ओठांवर, पापण्यांवर वाळत टाकता
चविष्ट खरपूस वादविवादांच्या शेकोट्या तुम्ही
गहिवरून आनंदित कृतकृत्य...

ती परमेश्वर असेल असं मी कधीच म्हटलं नाही
पण तिला पांघरून घेणं
तुमच्या अर्धनग्न देहासाठी आवश्यक आहे!



## महानगर – २

थोड्या उंच इमारती
थोड्या उघड्या बायका
थोडेसे नागडे पुरुष
थोडीशी पोटांची एकाकी बेटं
थोडीशी यंत्रं, माणसांना खाणारी
थोडासा माणूस माणसांना खाणारा
महानगर म्हंजे अजून काय असतं?

## महानगर – ३

एक बुडणारा समुद्र
एक व्ही. डी.चा पेशंट
एक कंटाळ्याचा चष्मा
एक काळंभोर कुरूप
आणि सगळं मिळून एक मोठं फ्रॉड!


A One Sinking ocean
A One Patient suffer V.D
A Bored pair Spectacles
A black Ugly Form
all together
one big fraud.

## महानगर – ४

तशी सगळी शहरं इथून तिथून सारखी
माणसांची राखीव कुरणं
असं म्हणत ती सावत्र शहरात आली
इथंही दुकानं माणसांच्या गर्दीत शिरत
घडी केलेलं शहर
पुन्हा पुन्हा नेसून दाखवत
हवापाण्याचे बदलणारे संदर्भ
निःसंदर्भ घरं — ओळखी
त्यातच एक बाई
पुन्हा पुन्हा चहा घेऊन येणारी
तसं सगळ्याच शहरातल्या बायका चहा करतात
आपापल्या नवऱ्याबरोबर पितात
जाताना एकट्याच
याही शहरात हवेला झाकणं
छान कपडे घातलेल्या अफवा
काळीज नसलेल्या भुकेचं भूत
हिंडत शहरात राजरोस
मृत्यूला दगड मारणारी लहान मुलं
शरीराच्या चकचकीत आरशात
न्याहाळत अदृश्य होणाऱ्या तरुणी



शब्दांचे लहान लहान दोर
फेकून अडकवून माझ्याकडे येणारी माणसं
जांभळ्या नजरेचा रस्ता
उडवतोय मजेनं बुडबुडे माणसांचे
शहरासकटच रानटी अवकाश
शिव्या न् घामाचा तापलेला तवा
श्वासांचे रिकामे पिंजरे
आणि हे सारंच ताणून धरलेल्या दोरागत
आडोशाला उभं रहावं मुसळधार पावसात
तसं अपरिहार्यपणे या शहरातून दुसऱ्या शहरात
खोलीच्या बाहेर यावं
तितक्या सहजपणे कुठल्याच माणसातून न् शहरांतून
बाहेर येता येत नाही
कुत्र्यागत शेपटी पकडत
आपण गोलच गोल फिरणारे
आयुष्याचं हाडूक चावत
शहरातल्या आरशात गुरगुरत भुंकत
याही शहरात आपण फिरलो
अंतर्बाह्य रिकामे निरर्थ.




## महानगर – ५

पावावर बुरशी साठतेय्
बूट पाण्यानं भरताय्त सारखेच
समोरचा एकसारखं बोलतोयच आपलं,
"life is a myth of Existense"
बऱ्याच वर्षांनंतर माणसाचा आवाज ऐकतेय्
जो येतोय् हुबेहूब गंजलेल्या पत्र्यागत
माणसं जागच्याजागी उभीच अजूनपण
एकमेकांना शाप दिल्यासारखी
समुद्राचा वास येतोय् जळलेल्या भाकरीसारखा
अनिश्चिताचा ध्वनी
दूरवरून हाकारतोय् पाण्याला
भविष्यातली आंधळी शतकं गाजरं खात
चालून येताय्त शहरावर
मी ऑर्डरची वाट पहात राहू काय अजूनपण?

## महानगर – ६

दुखावलेला समुद्र
वेळेच्या कठ्ठ्यावर तू आणि मी
तीव्र दुःखागत वारा
शांततेच्या डबीत ठेवलेला
शहराचा झोपलेला साप
बाण लागून अर्धमेली माणसं
आपापल्या बिछान्यात
आकाश विष पिऊन थकलेलं
पावलाखालची विस्कटलेली जमीन
या साऱ्यात तू माझ्याशी काय बोलणार?
किमान जगण्याची आशाळभूत गृहितं
सारेच संबंध अटीतटीच्या घोड्यावर बसून
किनाऱ्याला आलेले
आणि लंगडा वसंत खुरडत येतोय् माझ्या दिशेने
तुझ्यामाझ्यातलं विछिन्न अवकाश
तरुण होता होता आपण रात्र झालो
खडकांचे पक्षी
पाण्याचं खदखदून हसणं
होड्यांची चुकार स्वप्नं चमकताय्त दुरून
मनासकट हात उघडून
आपण या एकाक्ष प्रेमाला होडीत ठेवू न् सोडून देऊ
क्षितीज नांगरून गेलंय् आपल्यातलं अंतर
काय पेरायचं ते तू ठरव.



## महानगर – ७

हिरव्या मुली खिदळतात
कापराचे डोळे पेटवत
विक्रीला उत्सुकलेल्या सफरचंदागत बायका
सकाळीच उठून रात्रीची वाट बघतात
न् रात्री रात्रभर जागून दिवसाची
तसं पहाता सगळंच क्षेमकुशल वरपांगी
समुद्र धडाडत रहातो
काळाभोर रस्ता सरसरतो
मशिनवरल्या पट्ट्यागत
रस्त्याला डाव्या हातानं बाजूला करून
उजव्या हातानं चूल पेटवणारी बाई
हुकाला टांगल्यागत बसमधली धडं
पोटाचा इमानी कुत्रा गुरगुरत रहातो
मेंदूच्या लांबलचक साखळीला न जुमानता
इथं आपलं कायपण नाही
हिप्नोटाईज केलेले बाग, पक्षी उरले–सुरले
फुलं, पानं इत्यादी
मरीआईवाल्यागत प्रत्येकजण चाबूक ओढतोय्
आपल्याच रक्तप्लवित पाठीवर

दत्तक घेतलेले देखणे चौक
न् भिरीभिरी फिरणारी अनाथ पोरं
इथल्या सुरांचं एकतरी पाखरू पांढरं आहे का?
टांग्याच्या घोड्यागत आपण कालबाह्य होतोय्
न् कालनिर्णय हसतंय् भिंतीवरून चिरंजीव
सगळं घडतंय विसंगत न् मनाच्या बाहेरचं
शरीर मोडत जातं शांतपणे
आवाज न करता
हिरव्या मुली अंगाची घडी करून
बंद होतात रात्री स्वत:त
घाबरून गर्भाशय तपासतात
रात्री अपरात्री
अजूनही
या शहरात खूप आदिम बाई बाळंत होते
ओरडत किंचाळत
न् जुनंच मूल जन्माला येतं
शहराच्या मुळावर
पुन्हा पुन्हा...

## महानगर – ८

मी स्वीकारू शकत नाही माझा चेहरा
जो झालाय् काचेचा
न् ज्यातनं शहर भरभरून सांडतंय आसमंतात
शहर ठसठसतंय त्वचेतून
भेगाळतंय
नख निघून गेलेल्या गुलाबी मांसासारखं नग्न दुखावलेलं
किंवा रस्ता चुकलेल्या मुलीसारखी गोंधळलेली रडवेली पहाट
इथली शांतता झोके घेते मरणाच्या झुल्यावर
सारे सावरतायंत इथं एकमेकांना
पाणी हसतंय समुद्रातून खळाळून
आनंदात फसवले जातो आपण अल्लाद
दु:खावून भोगतो सोहळे जगण्याचे
आरसे वाहून नेणाऱ्या त्या माणसाची पाठच झालीय् आरसा
तो थकलाय शहराचं प्रतिबिंब वाहून वाहून
न् पुलाची चढण संपत नाहीयं
आजकाल शहरात सर्वत्र कारंजी
पोटातलं भुकेचं पाणी वाजवत ती पहायची
हे महानगरा,

किती पिढ्यांची शिदोरी तुझ्याकडे?
ही आजारी हवा किती दिवस जगेल अजून?
समुद्रानं हात उंचावले
माझ्यासारखं जगून घ्या म्हणाला
माझा चेहरा तडकू लागलाय्
एका लहानशा दु:खाला हातात धरून मी हिंडले शहरात
तर एक माणूस ऊन खणत होता
मी म्हटलं, “कसंय?”
म्हणाला, “ठिकाय्.”
दुसरा बसला होता सावली चघळत
तो म्हणाला, “थू”
तिसरा कायमच झोपलेला अधांतरी तिठ्यावर
त्या तिसऱ्याला खिशात टाकून उरलेले दोघं
परतले माझ्या चेहऱ्यात
तो आरसेवाला कुठं गेला
न् हे शहर एकाएकी कुठं उठून चाललं माझ्यातून?
माझा चेहरा मरून गेला की काय?



## महानगर – ९

तो म्हणाला, माझ्या केसांवर कविता कर...
मी म्हटलं..., केस न् धूळ या दरम्यान असलेल्या
माणसावर मी लिहिते...
केसांबद्दल कवतिक फक्त न्हाव्यांना
किंवा वयात आलेल्या मुलांना
जे केस कापण्यावर किंवा वाढवण्यावर
तासन्तास बोलू शकतात
तुमचं अंतरंगाचं रान आहे का मोकळं?
ज्यात माझ्या अर्थांचे घोडे भरधाव दौडू शकतील
जाणिवेची गतिमान लांब रेषा आखून
हिरव्या गवतावर आठवण ठेवून जातील
आताच एक पिंजारी
तार वाजवत गेलाय् दारावरून
त्याचे केस, हात, पाय, सारंच थरथरत
जणू त्यानं तारेसारखं स्वतःलाच छेडलं होतं
त्याच्यावर पण लिहायला मला आवडेल
तसं अस्तित्वाचा असतो तळ फुटकाच शेवटी
तुम्ही म्हणता म्हणून मी चढवतेय् त्याला चुल्यावर
अशात आपण आपली भाषाच हरवून बसलोय्
न् त्याचं वाईटही वाटेनासं झालंय
न् तू म्हणतोस माझ्या डोळ्यांवर लिही किंवा ओठांवर...
या देशातले



या समाजातले
या शहरातले
या गावातले सगळे अर्थ मला हाकून कुठं घेऊन
चाललेत मला कळत नाही
मला संगती लागत नाहीय कसलीच
आजकाल तर मला
अन्नाची चव आठवत नाही
कच्च्या मांसाचा गंध आठवत नाही
कच्च्या दुधाचा गंध आठवत नाही
न् तू म्हणतोस की तारुण्यावर लिही...
मला खरंच खूप लिहायचंय
पण माझं भाषेचं वासरू कुठं सापडेना
थोडंसं थांब,
हे मूठभर शब्द घे
पेरत चल माझ्यामागे
आता आपण थोडीशी वाट पाहू
तोपर्यंत तारुण्य पिकून जाईल
न् दुःखाची पिवळीधमक सळसळ ऐकू आली
की समजू... कापणीला आलंय्
मग मी सगळ्यावरचं लिहू शकेन... मनापासून
तोपर्यंत थांब थोडंसं...



## महानगर – १०

खिडकीच्या बाहेर एक खिडकी
खिडकीला असते एक चौकट
न् चौकटीत आपण
न् आपल्यातसुद्धा एक खिडकी
खिडक्या असतात
अलिप्त राष्ट्रांच्या बैठकीसारख्या
त्या घरातपण नसतात न् घराबाहेरपण नसतात
खिडक्या असतात डोळे मारणाऱ्या छचोर
खिडक्या करतात खुणा
किंवा खिडक्या असतात आया
वाट पाहणाऱ्या न थकता
खिडक्या होतात डोळे पाणावलेले
खिडक्या असतात दार्शनिक
उदास उदास वाटलं की लोक बघतात खिडकीबाहेर
किंवा काहीच बोलायचं नसलं
किंवा खूप बोलायचं असलं तरी
पण खिडकीतून खिडकीकडे बघायला
उभा जन्म घराबाहेर काढावा लागतो!


## महानगर – ११

शहर बलात्कारीत
गर्दीच्या गर्भानं जडावलेलं
वेळेचा पारा
पाय रेसचे घोडे
समुद्राचं चुंबन घ्यायला
न् वाऱ्याचे उडणारे केस सावरायला कुणाला वेळ नाही
प्रत्येक क्षण जन्मतो नवं गुपित घेऊन
न् तरीही बसचं लालभडक डोकं दिसल्यावर
सर्वांनाच आनंद पुत्रजन्माचा
सत्याचा सैतान थयथया नाचतो
आम्ही आमचे आत्मे चूपचाप त्याच्या हवाली
करावेत म्हणून
आयुष्य म्हंजे एक अपरिहार्य सूर्य
जो पेलवत नाही, पहावत नाही
पचवला तरी कर्णासारखं दुर्दैवी बळी व्हावं लागतं
कित्येक शतकाचे आम्ही भुकेले आहोत
प्रत्येक शोधानंतर
प्रत्येक भाकरीनंतर
प्रत्येक माणसानंतरही
आम्ही भुकेले आहोत
शरीराची दामटी वळली
तरी स्वप्नांची भाकरी होत नाही
कवितांचे घोस तोडून मी मचमच खाऊ शकत नाही
साहित्यानं रस्ते बदलता येत नाही
फक्त साहित्यिकांच्या नावाचं कुंकू रस्त्याला लावता येतं
न् मग कार्पोरेटर बदलला की ते नाव बदलतं
म्होतुर लावलेल्या बाईसारखं
हे बलात्कारीत शहर उभय् माझ्यासमोर
कविता त्याच्या तोंडावर फेकून
मी पळ काढू इच्छिते
तर जमत नाही
आत्म्याचा विदूषक हातोडा आपटतो
न् मला संपूर्ण फाशीची शिक्षा सुनावतो
त्यामुळं हल्ली मला रोज मरावं लागतं.

## महानगर – १२

कोलाहलाचा काळाकभिन्न ढग
गर्दीचं कुरुप कासव रांगणारं
रेसचे घोडे माणसांना खेळवताना
किरमिजी हवेचं जहर विकणाऱ्या बायका
अवयवांची सजलेली दुकानं
फॉरेन करन्सी... अरब आणि वेश्या
आर्ट गॅलऱ्या आणि त्यातली सोफॅस्टिकेटेड मुलायम पेंटिंग्ज
गेटवेचा दरवाजा
स्मगलर न् विजेऱ्यांच्या लसलसत्या जिभा
चिरूट न् हशीश
अफू डालडा कंट्री न् स्पिरिट
आर्ट पिक्चर बियर, कानकोरणं वगैरे
चौकोनी ठोकळ्यांच्या बिल्डिंगा
ज्यात फर्निचर रहातं
मंत्रालय न् फायलींची अंडी उबवणाऱ्या
गलेलठ्ठ कोंबड्या
खुर्च्या सनातन मठ्ठ न् पाशवी
हे शहराचं अस्वल
कोणत्या दरवेशाच्या तालावर नाचतंय?
उडणारे कावळे बुडणारी स्वप्नं
अपेक्षांचं आईस्क्रिम
हप्त्यानं घेतलेला फ्रीझ–टी.व्ही.–मिक्सर
बायको फक्त एकरकमी
ब्युटीपार्लर खटाव–टेरलीन–कविता–भयाण शून्यता
पोलिस कायदा न्याय शासन
माकडानं धरलेलं माकडाचं शेपूट
आणि तळ्यातला चंद्र
कारखाने–संप–आजारी गिरण्या

इराणी गुलाबी चाय
चौकातले प्रामाणिक पुतळे
प्रॉव्हिडंट फंड — ग्रॅच्युअटी
प्रीतीभोजन
झोपड्यातलं पाणी उपसून थकलेला बाप
किंवा अवघा समुद्र बादलीत भरू पहाणारा मुलगा
फुलपाखराला न् कवितेला घाबरणारा मध्यमवर्गीय
आपापल्या प्रतिभेचे मासे काचघरात ठेवणारे लेखक
स्वातंत्र्याचे सुरे बगलेत ठेवून मारेकरी हिंडतात राजरोस
नजरेनं बायांचे कपडे फाडतात
सगळेचजण भोज्या शिवल्यागत
आपापल्या खांबांना घट्ट चिकटून
चैतन्यहीन अस्तित्वांचे निर्बीज जंतू
सिंदबादच्या म्हाताऱ्यागत हे शहर
खांद्यावरून उतरतच नाहीय
या शहरानं कैद केलेलं प्रत्येकाला
ही एक नजरकैद आपणहून स्वीकारलेली
हा घड्याळाचा घाणा
हे काळाचं काळं मांजर
आणि या शहराची शिंगं आता आपल्याला गोड लागतायंत
हे शहर कमालीचं क्षमाशील न् असीम
वात्सल्यमयी न् क्रूर
भोगदायी न् विरक्त
दाहक न् करुण
शहर एका दुर्लक्षित अटळ सत्यासारखं रुतलेलं रक्तात
शहर–जन्म आणि मृत्यूमधलं अटळ आयुष्य
शहर पोट न् मन सांधणारा दुवा
शहर–तुमच्या माझ्या हातात सामावलेलं आकाश.



## महानगर – १३


हिजड्यांनी साजरा केलेला शहराचा जन्मोत्सव
सादळलेल्या रक्तातला चामड्यांचा जन्म
शहराची आखीव नाळ कापलेली
''कुणी गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या''
झिम्मा खेळणाऱ्या
पांढऱ्या टोप्या घातलेल्या सवाष्णी
नाक्यावर बसमध्ये ऑफिसमध्ये
पुरुष उभे कंबर वाकडी करत डोळा मारीत
तरी त्यांना कुणी वेश्या म्हणत नाही
स्वप्नांचे सरकारमान्य गर्भपात
साहित्यिक कवीबिवींचं सरकारमान्य खच्चीकरण
वर पैशेबियशेपण देतात
इथं सगळे समागम
कंपलसरी एका मिन्टात उरकले जातात
अपंग आपद्धर्म
न् पुन्हा मुलंबिलं होणं हा एक चांगला ॲसेट
स्वस्त नरक योजनेतले ट्रान्झिट कॅम्प्स
सिमेंटी सिफिलिस चिघळतोय्
दारुण रात्रीतला केविल समुद्र
दशहतीचे चकाकणारे डोळे
अंगाई गाणारं कुत्रं



झोपलेले दगडी चेहरे
दिव्यांना झालेली कावीळ
हरवलेल्या मुलांना गिळतायंत रस्ते
चांदीच्या चांदोबाचं गाणं
हल्ली कुठल्याच मुलाला येत नाही
फुलं वेचावीत तशी सिग्रेटची थोटकं वेचणारी
मुलं
आपसूक वाढतात तशी मरूनही जातात
ब्लेडनं सरसरीत कापावी धमनी
न् रक्तपूं गळावं तशा वस्त्या इथल्या
अरे धूर्तांनो,
इथल्या कुठल्याच ऋतूला तुम्ही ओळखत नाही
मग हा शब्दांचा शिमगा कशासाठी?
दारू चढल्यावर एकच करा
चंद्राच्या दिशेने तोंड करून शिव्या द्या
किंवा नेहमी सारखीच आत्महत्या करा
मनातल्या मनात
किंवा मग शहराच्या सजग रस्त्यांवरून
एक समर्थ आयुष्य हाकारत न्या.


## महानगर – १४

हे शहराचं बोअर चित्र पाहून
सैतानालाही जांभई येईल
सकाळी उठा, तोंड धुवा, चहा प्या, जेवा, झोपा
काय अर्थ आहे कशाचा कशाला?
रात्री स्वतःला गोळा करून झोपतांना
कित्येकदा असंही वाटलं
सकाळी झाडूवाला लोटून तर नेणार नाही ना?
शहर नुस्तं बेडकासारखं मख्ख बथ्थड
नुस्ती कवितांची कलमं लावून काय होणारय्?
सरतेशेवटी कवितांना असतं त्यांचं स्वतंत्र अंगण
त्यांची झाडं नंतर पाणी न घालताही
वाढत जातात अंगभर रानभर
आपल्या हातात काहीच उरत नाही
यंत्रानं लदबदलेल्या या तेलकट शहरात
एक स्वतः सोडून आपण काहीच लावू शकत नाही पणाला.



## महानगर – १५

आपलीच पेशी ओळखत नाही
आपल्याच दुसऱ्या पेशीला
अख्ख्या अस्तित्वाचा साप
शेपटाकडूनच गिळू लागतो स्वतःला
माणसं कंटाळवाणी आजार झालीयत्
न् शहर बेचव जीभ
आता आपण स्वतःला कुठून तपासायचं?
मृत्यूला न जगण्याला सारखंच घाबरतो आपण
नुस्तेच अर्थांचे घोडे चरत राह्यले आपल्यात
प्रत्येकाला आहे अदृश्य शेपूट
न् आपापल्या गुहेत प्रत्येकजण आहे
आदिम न् तीव्र
खरोखरच माणूस म्हणून
आपण शिजलोच नाही कधी
आपण आपल्याला खायलाही लायक नाही
तसा कोणत्याच कृतीला
शाश्वत अर्थ नाही राहत या प्रचंडतेत
सगळ्या महान कृती
होऊन जातायत् सुतार पक्षागत
ही सारीच फसवणूक
अक्षम्य अघोरी, न् सुंदर
यातच हळू हळू बाहेर येत रहातो आपण
स्वतःला पहायला
तेवढाच एक क्षण आयुष्यभर पुरावा
जगायला किंवा मरायला ॥





## महानगर – १६

किती छान दयेचा विषय झालोय आपण
हे फाटके बूट घालून घालून
न् वाट पाहून पाहून
आता रडूही येत नाही न् हसूही
टपल्या मारून जाणारे
चुकचुकत सांत्वन करणारे
किंवा निखळ प्रेम करणारेसुद्धा भेटतात
पण रस्ता दगा देतोय्
हिरसून जाणं सारखंच
न आता मनाजोगतं होतंय म्हंजे काय होतंय
काय की
प्रत्येक परीक्षेत काही प्रश्न तेच तेच यावेत
तशी ही निराशा
आपण आपला राग बुटावर काढला
तर ते फाटून गेले
रस्त्यावर काढला
तर तो संपून गेला
आपला साथीदार तर पुढच निघून गेला ना
आता रस्तापण संपलेला
न् बरोबर नाही कुणीच
मागं वळून जायचे दोर कापलेत केव्हाच
कुठं जावं आता
की जिथं आपण नेमकं वेळेवर
पोचू शकू
जिथं आपलं नाव आपल्या आधीच
जाऊन बसलं असेल खुर्चीवर
अशी कुठली खुर्ची रिकामी असेल
माझ्यासाठी
की जिथं मी एकटीच माझ्या नावासकट
असेन अस्तित्वात.

## महानगर – १७

रोज रात्री या शहराचे दरवाजे बंद होतात
न् शहर स्वतःत उघडतं
आपण आदिम न् पाशवी होतो
आसस्वीच्या किनाऱ्यावर इच्छांचे घोडे सफरचंद खातात
शरीरांच्या पेट्या उघडतात
कितीतरी गुपितं स्वच्छ चमकदार
दगडांसारखी उघडी पडतात
पाऊस पैंजण पाऊल वाजवत येतो
अरुंद गल्ल्यांमधून भयाचं गढूळ पाणी वहात रहातं
फटकन् फुटला जातो अख्खा माणूस इथं
हवेखाली
माणसंच्या माणसं नांगरून पडल्यात इथं
खूप वर्षांपासून
स्वप्नांचं काळं मांजर : येतंय जातंय
लपलपा माणसांना पितं अधूनमधून
मी परवा पाह्यला एक मेलेला माणूस
त्याच्या बंद डोळ्यांतून शेकडो माणसं
पटापट बाहेर आली
न् शहरभर सांडली
खरंच,
या शहरावर प्रेम करता करता थकून गेलो आपण
प्रेम संपवतं असं आपल्याला
पाठ फिरवून आपण जेव्हा परत येतो आपल्यात
तेव्हा कुजण्याचा वास येईल पुन्हा आपल्याच प्रेताचा
बाहेर येऊन पहायचीपण सोय नाही आता
शहराचे दरवाजे बंदच असतील
न् आपल्या कुणालाच मंत्र येत नाही दार उघडण्याचा
आपण फक्त आत येणारे
किंवा आपल्याला फक्त प्रेम करत करत बंद होता येतं
किंवा कोंडून मरायला आपल्यालाच आवडतं असही.



## महानगर – १८

प्रचंड उत्पाताचा कोसळलेला परमेश्वर
कॉफीनींचं नांगरलेलं शेत
फुत्कारणारा हवेचा विषारी सर्प
यात मी माझ्या प्रियकराला कुठं शोधू?
जन्माआधी न् जन्मानंतर
सगळीच मुलं असतात सारखी
न् मेल्यावर मरणारा ओळखही देत नाही
तुटलेले हात
तुटलेले पाय
जळलेल्या कलेवरांचा असह्य ढीग
यात मी त्याचा कलावंत हात कुठं शोधू?
कुठे शोधू त्याचे ओठ?
कुठले पाय त्याचे?
कुठले हृदय त्याचं?
की तो नाहीच इथे?
की तो कधीच नव्हता?
हा वेदनांचा पाऊस
सांत्वनाच्या ओंजळीतून पकडून थांबेल काय?


## महानगर – १९



मी मरून बराच काळ लोटलाय्...
माणसं खरी रडणारी न् खोटी रडणारी
दोन्ही घरी गेलीयत्
जेवूखाऊ लागलीयत्
अंघोळ करतायत्
माझं काही म्हणणं नाही त्याबद्दल
मीसुद्धा हेच केलं असतं
पण इथं सारं इतकं शांत
न् माझ्या शरीराचा हा थंडगारपणा
मलाच सोसवेनासा झालाय्
भुसभुशीत माती नाकातोंडात जातेय्
न् बारीक किडे रांगोळी काढल्यागत
फिरतायत् इथं तिथं
मी किती सांगितलं
विसकटू नका माझं शरीर
मला तुझा स्पर्श जपून ठेवायचाय्
ही झाडांची मुळं हे तंतू
हळू हळू लपेटून घेतायत् रे मला
न् मला आठवली तुझी
ऊष्ण आश्वासक मिठी
न् नको नको झालं
मी म्हटलं मला गिळून टाकू पहाणाऱ्या मातीला
मला घरी जायचंय्
मला माझं शरीर दे
तू कसं ओळखणार नाहीतर?
किड्यांनी खाल्लेले डोळे घेऊन मी कशी
जाणार?
पहा,
माझी चामडी विरघळून चाललीय्
पांढऱ्याशुभ्र अस्सल हाडांचं
एक नग्न सत्य फक्त माझ्यापाशी
तर शेजारून कुबट हसलं कुणीतरी
म्हणालं,
प्रत्येकाचा ताजमहाल पांढऱ्या हाडांचाच असतो.
सत्य कुजत रहातं आत न् आपण
बाहेरून छानय् म्हणत
असू दे
तरी मला यायचंय् घरी
मला या शहराची नस न् नस माहितीय्
जमिनीवरून काय
जमिनीख़ालूनपण मी येईन रस्ते शोधत
मला ओळखणार नाहीस कदाचित
तर ऐक
पहिल्या कवितेतल्या पहिल्या वेदनेसारखा
माझा चेहरा असेल
तेव्हा ''तू कोण'' म्हणून विचारू नकोस
नाहीतर पुन्हा मरण्यासाठी
मरण शिल्लक नाहीय् माझ्याकडे!


## महानगर – २०

भिंती कोऱ्याकरकरीत अलिप्त
उसासे न् कोमट निःश्वास
हवेवर साचलेले डबक्यागत
माणसं पोकळ पोकळ बसलेली
किंवा उभी
मधूनच एखाददुसरा हुंदका ओला गर्द गहिरा
किंवा मधूनच चिरका
भिंतीवर सुरीनं ओरखडावा तसा
त्या प्रचंड पेटीचं झाकण
झपकन् उघडलं
तो गर्द लाल जबडा
त्याला पटकन् आत ठेवला
सर्व निमूट चूपचाप भयचकित
दार बंद झालं
नाळ कापताना येतो तितका अस्पष्ट आवाज आला
''पाच मिनटांत मोकळं व्हाल''
असं तिथला माणूस निर्लेपणे म्हणाला
आता दार उघडेल पुन्हा तेव्हा काय दिसेल?
गरम राख पांढरी हाडं
की– एक हसत मुठी वळवत पहुडलेला गर्भ?



## महानगर – २१

पाऊस शोधत होता शहरभर
वैतागून थयथय मुसळधार
काळजीनं व्याकूळ होऊन
हळव्या सरीनं थांबून इथं तिथं पहात
पण मी त्याला कुठचं दिसले नाही ।



## महानगर – २२

तुला आठवतं
त्या दिवशीचं आभाळ
गच्च झालेलं, भरून आलेलं
सगळं गडद
आपण उभे होतो पावसाची वाट पहात
आणि पाऊस येईचना
तू होतास जवळच
समोर गर्द शहर मीलनोत्सुक
पण पाऊस नाही
मला आपोआप रडू आलं... थांबेचना
तू उदास
आणि शहर केविलवाणं गप्प
वाट पहात पावसाची.

## महानगर – २३

पानांनी हिरवेपणा जपावा
तसं या शहरानं जपलेलं माणसांना
जहर पचवलेल्या माणसाचे डोळे
असतात जितके दुखावलेले पण समजूतदार
तसं हे शहर
हरेक नग्न भुकेवर पांघरून घालणारं...
आज या घडीला
मला प्रियकरापेक्षा हवंसं वाटणारं हे शहर
कारुण्यमय बुद्धाच्या चेहऱ्यागत
किंवा मनभरून बरसणाऱ्या पाऊसधारागत
हे शहरा,
तुझ्या मिठीत मला विसरून जाऊ दे
तुझ्या कुशीत ऐकू येणारे सुस्कारे
हे विव्हळणं हे आक्रोश
किंवा जल्लोष
केवढ्या विकारांचा तू साक्षीदार
किती रुपं तुझी
तुझा रक्ताळलेला हात पुढं कर
माझ्या चुंबनानं तो घाव
कदाचित भरुन येईल
हे महानगरा,
थकलाय, तू अनिवार
तुझं मस्तक टेकव माझ्या खांद्यावर
तुझा क्लान्त चेहरा
लपवून टाक माझ्या गर्द केसात
मी तुझ्यासाठी अमृताचा पाऊस मागेन
तोवर विसावा घे माझ्या मिठीत
मी तुला अजून काय देऊ?

## महानगर – २४

कित्येक वर्षांपासून
या शहरातले लोक झोपलेले नाहीयंत
रात्र झाली की माणसाचं रुपांतर होतं
वेगवेगळ्या भुकेत
आणि एक भूक खाऊन टाकते दुसऱ्या भुकेला
मोहाच्या झाडावर लटकणारी असंख्य माणसं
रात्र झाली की उडू लागतात
आंधळ्या शरीरांच्या दिशेने
आतड्यांच्या अरण्यात
आपण हरवत आलो नेहमीच
एक शुभ्र गरम भाकरसुद्धा
मात करते आपल्यावर
शहरावर दिवसा राज्य करतात रोबो
न् रात्री बायका
न् तरीही एखाददुसऱ्या कवीलाच फक्त संशय येतोय्
आमच्या जगण्याचा.



## महानगर – २५

ती रात्र मृदूमांसल
तो निळासावळा कृष्णरस्ता
न् हा समुद्र कामातूर विव्हल
मी हरवलेय् चंदनी शांततेत
न् अचानक एक निर्जन पुरुष शेजारीच
भातुकलीच्या खेळण्यातला इवला इवला
जो मागतोय् माझं स्त्रीत्व
ते मी कसं देऊ?
ज्यावर फक्त या अंधाराचा अधिकार आहे
ज्यावर अधिकार या शहराचा
या रात्रीचा
या रत्नजडित रस्त्याचा
या समुद्राचा
शिवाय स्त्रीत्व केवढं अवघड न् पचायला कठीण अस्तं
हे का कळत नाही
या शहरातल्या पुरुषांना?
का यांना आमची आदिम भाषाच कळत नाही?
तो काय बोलतोय मला ऐकू येत नाही
न् शहर स्वच्छ हसतं
माझ्याकडे पाहून
न् प्रणय करतं लडिवाळ
मी आत्ममग्न धुंद
समुद्र झेपावत रहातो पुन्हा पुन्हा
माझ्यावर आक्रमक
मी तृप्त शांत न् उदास.

## महानगर – २६

मी एक गोडसर विष आहे
किंवा मी आहे खारट हवा
किंवा मी आहे प्रदूषण शहरातलं
जे तुम्हाला नकोस् तरी तुम्ही स्वीकारता
किंवा मी आहे एक थंडगार चार पायांचं टेबल
इराण्याच्या हॉटेलमधलं
तुम्ही जमता, चर्चा करता
मुठी पळवून आपटता आणि वांझ होता होता निघून जाता
न् तुमच्या शब्दातली राख अंगावर घेत मी स्तब्ध
किंवा मी होते मग खुर्ची
अशी खुर्ची की तुमची लोकशाही विधवा होते तिच्यासमोर केस सोडून
न् तुम्हाला माहीतही नसतं
की तुम्ही केवढे गरीब न् केविल होता खुर्चीवर बसल्याक्षणी
नुसत्या हिंस्रपणात न् कुठल्याही सत्तेमध्ये
असतं मानव्याचं खुजेपण न् गरिबी
जी तुम्ही स्वीकारता किंवा पचवतापण हल्ली सहजपणे
याची लाजही वाटत नाही
तुम्हालापण न् मलापण
किंवा मग मी होते अचानक एक विव्हळणारं गर्भाशय
जी अशी जागा आहे की जिच्यात काही उपजलं तरी माणूस दुःखी होतो
न् नाही उपजलं तरी!
मी अशी एक प्रत्येक गोष्ट आहे
की जी नाकारल्यावर तुम्ही जगू शकत नाही
न् स्वीकारल्यावरपण
मलाही पर्याय नाहीय्
न् तुम्हालाही
म्हणूनच म्हणते की मी एक गोडसर विष आहे



एक असं शहर आहे माझ्यात
जे तुम्हाला जागवत उत्कट
न् मारतंही हळूहळू
पण काळजी नका करू अजिबात
घाबरूही नका
कावरेबावरे होऊ नका स्वतःचं रान नसलेल्या सशासारखे
मी आता स्वतःलाच प्यायचं ठरवलंय्
तेव्हाच तेज अन् विषाचा गंध
दोन्ही पेलायला तुम्ही समर्थ आहात ना?


## महानगर – २७

पिवळीजर्द रद्दी बांधून ठेवावी वर्तमानपत्रांची
तशी ही विकल जुनीपुराणी माणसं
कुणी बांधून ठेवलीयंत् इथं
पानावरच्या अंधुक अस्पष्ट अक्षरांगत
वाचता न येणारे त्यांचे चेहरे
तर काही चेहऱ्यावर अदृश्य शाईनं लिहिलेलं असतं
फारच थोड्या कागदांतून नवीन कागद जन्माला येतो
माणसांचं पण थेट अगदी तसंच
काही माणसं सगळीच्या सगळी म्हंजे कोरा कागदच
काही वेळेला कोरी माणसंच वाचणं खूप अवघड न् सुंदर
आता मी ज्यावर लिहितेय् तो कागद
म्हंजे एक माणूसच होता
पण मी कविता लिहिता लिहिता
अचानक त्या माणसाचं कागदात रूपांतर झालं
दर रात्री पेनमधून शाई झरावी थेंब थेंब
तसे डोळे झरत रहातात
न् शरीर होऊन जातं टीपकागद
रात्र जे दुःख देते ते टिपलं जातं अल्लाद त्यात
मला व्हायचंय् एक स्वच्छ पांढरा कागद
ज्यावर तुम्ही तुमचं नाव लिहू शकाल किंवा होडी करू शकाल
पावसाच्या पाण्यात सोडण्यासाठी
किंवा विमान करून नेम धरून फेकाल प्रेयसीवर
आणि मग मी कागद नाही माणूसही नाही
मी कविताच होऊन जाईन.



## महानगर – २८

आजकाल रोजचे निभवणे कठीण होत चाललेय्
घरसफाई, रोजची भाजी कुठली करावी यासारखे
निर्णय घेणे निकडीचे वाटेनासे झालेय्
प्रश्न नुसता निभवण्याचाही नाही
प्रश्न आहे की या साऱ्यातून
बाजूला झाले काही काळ
तर हे निभवणे कुणी आठवणारही नाही
आठवावे कुणी मगच कराव्या गोष्टी
अशी अट कधीच नव्हती
नसावीच कुणाचीही
पण वाटत रहाते अनेकदा
आजकाल मागच्या पानावरचे
विसरतात सारेच
न् पुढचे न् आजचे जगत रहातात
हे असे जगणे जमलेच नाही कधी
आणि कालचे बरेच. आजचे थोडे जगतच आले मी तरी इथवर
ही सरमिसळ तरी जमावी बेमालूम विनातक्रार
तर तीही नाही
आपण नालायकच सिद्ध केले स्वतःलाच
आणि त्याचं काही वाटतही नाही्
वाटतेय् ते एवढेच
की चकचकीत साफ केलेला तांब्याचा पेला
खूपवेळा धुतलेला
तू त्यातनं पाणी पिणार म्हणून
तू हे आठवणार नाहीस कधीच
मी दृष्टीदूर असेन तेव्हा.




## महानगर – २९

या पुरुषांचं लय म्हंजी लय आप्रूक वाटतंया बगा
मी म्हंते कसलं काळीज ह्ये
की आता दगड ह्यो थोरला
न् आत्ता पाणी निवळकंच
सोलून काढत्यात चामडी
न् वरनं फुंकरबी घालत्यात मायेची
आपटून धोपटून घेत्यात
मन असू द्यात कितीबी साफ
तरीबी इखात घालून बगत्यात
कंचा रंग येतोय त्ये
धडुतं फाटलं म्हनलं इक्तंबी आपटू नगासा
तर म्हनत्यात, 'तसंबी चाललं
कंच्या गाडवानं सांगितलं
रोज कापडं घालायाच पायजेल म्हून.'
आत्ता काय बोलन्यासारकं राह्यलं नाही बगा
गडी लयीच जिगरबाज
पन पान्यात खेळायचं
न् पानी अंगाला लागलंच नाय म्हनायचं ह्ये कसं?
रोजला येतोया नदीवर
न् म्हंतो हे पानी कंचं?
मी नाय वळखत?
लय जुलूम झाला गड्या
तर काय बया ग
सारं गाव आलं धावून
न् पान्याला नदीत टाकलं डुंबवून
न् बाजूबाजूनं मातीनं लिपूनशान टाकलं
नदीला बांधून घातलं
पान्याला मारून टाकलं
न् भाद्दर म्हंतो वर
च्यायला आंघुळीची पीडा गेली बगा
न् म्हंता म्हंता दोन टिपं गाळली
नदीच्या मेल्या पान्यासाठी
आता काय म्हनावं या कर्माला
या पुरुषांचं लय म्हंजी लय आप्रूक वाटतया बगा!

## महानगर – ३०

कोण आहे मी?
एक लहानसं पिल्लू? वरून धपकन पडलेलं?
दुखावलेले पंख इवले न् लाल चोच
हे जग आहे तरी कुठलं?
मी तर हे कधीच पाह्यलं नव्हतं
हे जग आलं तरी कधी जन्माला?
हे कोण धरून चालवतंय् मला?
हा रस्ता आहे?
कुठे जातो हा? माहीत नाही?
मग तरी जायचं का?
रस्त्यावरूनच का जायचं?
मग रस्त्यांना कुणी जन्म दिला?
का थांबू? प्रश्न नको विचारू?
खड्यात पडेन? मग हे खड्डे का पाडून ठेवलेत?
आपोआप पडतात?
पण तुम्हीच म्हणाला होता एकदा
आपोआप काहीच होत नसतं
खड्डे बुजवत का नाहीत लोक?
जपून का ठेवतात?
समजा मी खड्ड्यात पडले तर?
हात देऊन वर काढाल?
हात पाय मोडतील?
पण कळेल ना मला की खड्डा किती खोल आहे ते...
गप्प बसू?
बोलू नको जास्त?






का?
तोंड दुखेल?
तुम्हाला कंटाळा आला वाटतं?
आपण थांबू या थोडंसं?
पाय दुखू लागलेत
उचलून घेता का?
हे कसलं दुकान आहे?
आणि त्या बरणीत काय आहे?
होऽऽऽ
पण पैसे आहेत का तुमच्याजवळ?
हल्ली सगळं महाग झालयं् म्हणे
बरं....
सुट्टे पैसे परत आलेच आहेत
तर चुईंगमपण घ्या ना एक
समजा चुईंगमचं एक टोक
एका माणसाला लावलं
न् दुसरं दुसऱ्या माणसाला
तर अशी सगळी माणसं
एकमेकांना चिकटून बसतील
मी लावू शर्टाला हेऽ न् दुसरं माझ्या फ्रॉकला?
हसलात का?
माणसं अशी चिकटत नाही म्हणता
मला खूप वाटतं
सगळी माणसं चिकटून रहावीत एकमेकाला
तुम्ही बोलत का नाही?
गप्प का?


तुमच्या डोळ्यात कचरा गेला म्हणून?
थांबा मी डोळ्यात फुंकर घालते
हात सोडू नका
मी हरवेन गर्दीत
तुम्ही शोधून काढाल?
माझे वडील हरवलेत केव्हापासून
देता शोधून?
बोलत का नाही?
भरभर चालू नका
मला चालता येत नाही भरभर जमिनीवर
आपण जमिनीवरूनच का चालायचं?
चुकलं...
मी गप्प रहाते
पण तुम्ही हात धरून
माझ्याबरोबर चाला
तुमचा हात एवढा कडक कसा?
मारून मारून?
कुणाला सारखं मारता?
ती माणसं रडत नाही?
मी वेडी आहे?
इथं सगळी शहाणी माणसं रहातात?
मला इथं राहता नाही येणार?
मग मी कुठं जाऊ?
एकटीच जाऊ परत?
पण मग प्रश्न कुणाला विचारू?
पाखरं सांगतील का परतीचा रस्ता?
रस्ता देईल माझ्या प्रश्नांना उत्तरं?
बरं तर जाते मी
पण तुम्ही कुठे जाणार ?
....
नाही विचारत.



## महानगर – ३१


तो होता देवाचा पुत्र
तो थेट स्वर्गात गेला निघून
आम्ही कुठं जावं?
केवढे तरी हे क्रूस
तीक्ष्ण चमकणारे खिळे दहशतीचे यातनांचे दुःखाचे
यातला माझा क्रूस नेमका कुठला असावा?
क्रूस वाहून नेणं हे तसं यातनादायीच
पण जमाव पिटतोय टाळ्या
खदखदा हसतोय् पिसाटपणे
न् आसमंतात वाजवलं जातंय् उदासवाणं व्हायोलिन
वारा पागल होऊन सैरावैरा फिरतोय अनाथ होऊन
काळं वस्त्र घातलेल्या
उर फुटून रडणाऱ्या आया
निष्पाप दुधानं चिंब पदर
धुळीनं मळलेले अस्ताव्यस्त केस
मातीत खुपसलेली असहाय लांबसडक बोटं
त्यांना मला सांगू द्या
तुमच्या मुलाबरोबर तुमचा परमेश्वरही मरून गेलाय्
हे क्रूस फुलून राह्यलेत नियतीच्या बागेत
त्यातलाच एक मी उचलणार आहे
निराधार माणसांचं आकाश असतं
काळ्या ढगांनी भरलेलं
त्यांच्या प्रार्थना लहान मुलाच्या गूढ अपरिहार्य आर्त
आक्रंदनासारख्या
अविरतपणे ही नियतीची लाडकी माणसं
दुःखाचा क्रूस वागवतात शेवटपर्यंत
जमिनीला पाय न टेकवता
न् स्वर्गातही न जाता
ते बळी जातात अधांतरी क्रूसावर.





## महानगर – ३२

सारं वेगानं मागं पडत चाललंय्
झाडं जमीन राखाडी डोंगर
सारे आभासागत गतीनं विरघळतायत्
घरं जनावरं पशुपक्षी
धुक्याच्या समुद्रलाटेत गेलेत बुडून
आता तर केवढ्या गर्दीत होते मी
न् कुठं गेले सारे एकाएकी
एकटं रहाणं चांगलं का वाईट
याचा विचार करायलाही वेळ नाही
तोवर एकटेपणाचं गाव आलं
एकट्या गावात उतरले एकटीच
सुनसान फलाट
गिरमिटागत वारा फिरतोय
धूळ वारा प्यालेल्या खोंडागत
पायानं उकरतेय् स्वतःलाच
पालापाचोळा भिरभिरत आला
डोळाभेट घेतली
पायमिठी घातली
एकट्या गावात पाचोळा आहे
झाडं नाही
धूळ आहे उडणारी पण पाखरं नाहीत
सामान आहे, जेवण आहे माणसं तेवढी नाहीत
एकट्या गावात आहेत खूपशी घरं
लाल कौलांची
पुढं सारवलेली ओसरी
काही बंगले आहेत बाळबोध वळणाचे
रस्ते– काही असे, काही तसे
तुम्हाला मनापासून वाटलं



तरच इथं दिवे लागतात
नाहीतर अंधारपण एकटाच
सोबतीला चांदणं वगैरे काही नाही
गाणं म्हणावसं वाटलं तर म्हणू शकता मोठ्यानं
कुठूनही प्रतिध्वनी येणार नाही मात्र
मुख्य म्हंजे आपलं गाणं ऐकेल असं पाखरू नाही इथं
लिहावसं वाटलं पत्र तर कागदही नाही
धूळपाटी फक्त
बोटानं लिहायचं खूपसं, आपणच वाचायचं
न् पुसून टाकायचं
ही पाटी कधीच संपत नाही
तुमची बोटंच थकतील किंवा रक्ताळतील
एकटेपणाच्या गावात काहीच नसल्यामुळे
मला खूप कामं करावी लागली
क्षणात व्हायचं पाखरू
क्षणात व्हायचं झाडं
कधी तिऱ्हाईत परदेशी खोटा खोटा
कधी धूळ वेचणारं लहान मूल
कधी पाटील
कधी फौजदार
कधी खोटी खोटी गुरं
न् त्यावर बसणारं खुळं पोरगं तेपण मीच
एवढी साऱ्यांची आयुष्य जगताना
मी पडले आजारी
मग पुन्हा मीच तपासलं मला गंभीरपणे
न् मान हलवत सांगितलं मलाच
आजची रात्र कठीण आहे
मी काहीच सांगू शकत नाही
मग पदर डोळ्याला लावत बाहेर गेले ती मीच
शेवटची धुगधुगी ऐकताना वाटलं
माझं मरणपण मीच व्हायला हवंय् का?

## महानगर – ३३

आत्यंतिक सावधपणे सावकाश
ते सर्व मला शहराबाहेर सोडून आले
मी तटस्थ त्यांचे शोकाकूल डोळे पहात
हा कुठला खेळ?
की मला भोज्या शिवायला खांबच नाही इथं
हे नगर नाही की गाव
तळ्यात नाही की मळ्यात
हा हिंस्र अंधार माझ्या एकटेपणाला
दातात पकडून कुठं घेऊन चाललाय् ?
समुद्र कातर हळवा होत
मागं मागं सरकतोय्
न् आभाळात ही काळी झाडं कुठनं उगवलीयत्?
चंद्राचा तुकडा अर्धवट चावून खात
कोण पळालं ते माझ्या स्वप्नांच्या मागोमाग?
कुणीच का सांगितलं नाही मला
की प्रत्येक खेळ हातमोजे घालून खेळत जा म्हणून
संबंधाच्या खोलीत जाताना पूर्ण वस्त्र शस्त्रांनिशी जा म्हणून
या खेळात थांबायचं नाही
थकायचं नाही
पाहायचं नाही मनाच्या डोळ्यांनी
तू नको तितकं पहातेयस्
नको एवढे प्रश्न विचारतेयस्
नको एवढं प्रेम करतेयस स्वतःवर
खिन्न होत मी हसत गेले मोठ्यानं
तर राजाराणीची गोष्ट सांगत
त्यांनी पट्टी बांधली माझ्या डोळ्यांना रंगीत
तर मला पट्टीचे रंग दिसत होतेच

शिवाय बाहेरचं जगपण
शिवाय त्या सर्वांचे डोळेपण
तर त्या साऱ्यांनी मला जपून संभाळून
वेशीवर आणून सोडलं
इथली झाडं फक्त बुंधाच असलेली
ज्यांना सावली हवीय त्यांनी व्हावं सावली
लहान मुलागत मऊ हातांनी
मातीनं घाबरत स्पर्श केला मला
'मी आहे की,' म्हणाली
छोट्याश्या अळ्या बागडल्या माझ्याभवतीनं
एकमेकींच्या कागाळ्या सांगत हसत
तुझ्या मुठीत कायाय् विचारत
या बंद मुठीत माझ्या कायाय्?
एक उन्मुक्त असोशी? एक अनिवार आसक्ती?
की एक लहानसा समुद्र?
पाखरू आलं कुठूनसं
काजवे चांदण्यागत लखलखत आकाश झाले
म्हणाले सगळे, उघड ती बंद मूठ
पाहू दे समुद्र
तू होऊन जा छोटीशी मासोळी
न् जा तळहातातल्या समुद्रात ,
एक चंद्र हवाय् अर्धामुर्धा
न् एक होडी हवी
न् एक कोळी
न कोळ्याच्या हातात एक जाळं
समुद्र चंद्र होडी या दरम्यान मी तडफडत राहीन
न् एक अदृश्य जग विणत राहीन जाळ्यात.

## महानगर – ३४

या प्रेतातला वेताळ आता बोलणार नाही काहीच
कुठलाच राजा उत्तर देत नाही
आजकाल तर मला
नगर कुठलं न् स्मशान कुठलं हेच कळेनासं झालंय्
मी गोष्ट सांगायला गेलो
तर तलवारी उपसल्या सर्वांनीच एकमेकांवर
तेव्हा माझ्याच डोक्याची
शकलं होऊन ती माझ्याच पायावर
लोळायला लागली हे पाह्यलं नाही कुणीच
आता तुम्ही कशाला झाडाकडे येताय्?
इथलं प्रत्येक नगर स्मशान आहे
प्रत्येक माणूस असू शकतो प्रेत
मात्र प्रेतातला वेताळ असण्याची नियती फक्त माझीच
आणि आता तर माझ्या डोक्याची शकलं झालेली
पहात आहातच तुम्ही
मग मी काय गोष्ट सांगणार यापुढं?




## महानगर – ३५

शहरातली हरेक बाई आहे स्फिंक्स
कोरडी वाळू भुळभुळत रहाते शब्दांची
न् त्या दगडी डोळे उघडतात
पंजा पसरवतात
दगडी नखं रोवतात आत्म्यांवर गच्च
शहरातल्या प्रत्येक माणसाला प्रश्न विचारतात
माणसं घाबरतात बरीच प्रश्नांना
टाळतात तिची नजर
छोट्या छोट्या दुःखाचे कपडे घालतात
भित्रट डोळ्यांच्या ढाली समोर धरतात
अशांना ती खाऊन टाकते त्यांच्या ढालीसकट
न् प्रश्नांसकट
पण ना प्रश्न संपत
ना माणसं
ना तिची भूक भागत
कोणताच इडिपस फिरकत नाही तिच्याकडे प्रश्नांची उत्तरं देणारा
उन्हाचं गिलोटिन चकाकत रहातं
एक असह्य वांझपण थकून जातं
एक लांबलचक वाळवंट तिच्या नजरेत प्रतिक्षेचं
इडिपसच्या.

## महानगर – ३६

या शहरात
या रस्त्यावर पडून कान लावा कुठंही कुठल्याही रस्त्यावर... ऐकू येतोय
आवाज?
गुरगुरणारा
घोड्यांच्या टापांचा आक्रमक आवाज?
अजबय् सारं
तरी माणसं कान कोरत शांतपणे चाललीयत आपली
गप्पा मारत सिग्रेट फुंकत आपापली काम करतायत्
हृदयाच्या म्यानात गंज पडून
असलेली समशेर चमकून निघत नाही बाहेर
किती निर्धास्त आहेत हे सारे गर्भातल्या तान्हुल्यागत
समुद्राचं धुमसणं
न् रात्रीचं करुण रूदन ऐकू येत नाहीय् यांना
झोपलेली माणसं खूप छान दिसतायत्
थकलेली
स्वप्नानं भारलेली निःभ्रान्त
झोपू दे त्यांना
मी माझे डोळे काढून तळहातावर ठेवतेय्
शस्त्रागार उघडतेय् माझ्यातलं
आवाहन करतेय् काळ्याभोर वाऱ्याला
शब्दांचे अश्व टपटपत येऊ लागलेत असंख्य
आज मला अस्तित्वाचा अर्थ घासून
चकचकीत करू द्या
या मरणाच्या पात्यावर.





## महानगर – ३७

जगू द्या मला एक वजनविरहित आयुष्य
या खडबडीत शरीरावर कसल्या कसल्या
झुली पांघरायच्या अजून
दीर्घकाळ, चांगलंच वागणं कसं शक्याय कुणाला
असू दे ना माझं वस्त्र विरलेलं
काळ्याभोर पाषाणासारखा असू दे ना चेहरा
न् वागणं टचकन् पायात टोचावं काहीतरी असं
अहंकाराचा काळाभोर सर्प
कधीतरी फणा काढू द्या माझ्यातही
सगळेच दात विषाचे पाडून घेऊन
कसं निभणार माझं जगात
तू असलास बरोबर सदोदित तरी
एवढंपण जपू नये जिवाला दुसऱ्याच्या
न् एवढंही लक्ष ठेवू नये त्याच्या पडण्यावर
मी घाबरतेय त्या मधल्या रेषेला
आता फक्त बारीक रेघ आहे
त्यावर इमले रचू नकोस अहंकाराच्या दगडांचे
की तू मला न् मी तुला करू देणार नाही
न् तूही ते करू देऊ नयेस मला
कधीतरी वाटत रहातं
कसलं हे अहंकाराचं जनावर?
इतकं हे अलोट जीव लावणं
सुसाटत येतं माझ्यापर्यंत
न् तुला कोणता बांध अडवून धरतोय् ?
हे तुसुद्धा विचारू शकतोस मला
पण मला हेही माहितीय् की मी
बांध घालत स्वतःला
इथं उभीच तुझी वाट पहात
हेच आवडतंय् तुलाही न् मलाही
न् पेक्षा एक क्षितीज कायमच रेघ
आखून जाईल तुझ्यात माझ्यात.

## महानगर – ३८

हे काजळलेले किनारे
हा दगडी काळा सूर्य
न् हे दगडी मुखवटे
ती बाई विणत बसलीय् शतकं
काळाच्या पडद्याआड
दगडी भिंती मुखवट्यांच्या
छप्पर नाही
दालीचं घड्याळ वितळतंय्
ताणलं जातंय् काळाच्या लांब हातानं
घडी घालून ठेवलेली माणसं
कोण विसकटू पाहतोय्
चित्रातनं कोण निसटू पहातंय
खूप खूप बायका शहरातल्या
जवळ जवळ सगळ्याच
ज्यांच्या चेहऱ्यावर उगवतायत् वठलेली झाडं
न् पाखरं फिरकत नाही त्यांच्या तळहातावर
या बायका चौकट तोडून कुठं निघाल्यात?
एक नग्न निवांतपणा का दिसतोय् कुंकवाच्या जागी
न् त्या साऱ्याजणी मुखवट्यांना घाबरत नाहीत
की प्रश्नांना
या बायका सुंदर असहाय
का दिसत नाहीत?
माणसं पायऱ्या का होतायत् दगडी?
हे शहर असं वाकून का उभं आहे?
कुणी शिक्षा केलीय् त्याला?
या विशाल समुद्रातून या शहरात
आलेल्या सगळ्याच बायका अखंड कुमारिका कशा?
न् हे कुंवारपण
समुद्राशिवाय कळत नाही कुणालाच
न् समुद्र त्यांच्यासाठी खिन्न उदास हसतो हे ही
कळत नाही कुणालाच
जगातल्या साऱ्या बायका
असतात नेहमीच कुंवर
न् पुरुष परग्रहावरून आलेलं संशयास्पद अस्तित्व






अवकाशातून अवकाश तुम्ही कधी पाहिलंय?
निळंभोर - काळाकुट्टं चकचकीत
अपार-असीम
न् जमीन निळाईनं भारलेली एखाद्या
ग्रहावरची जिवंत
अनुभवलेत या बायकांनी
समग्र उध्वस्तपण उल्कांपातांचे
कशासाठी हे लोलक लावताय्?
अवकाशात खूप दूरवर पहाण्यासाठी?
साध्या जवळच्या बायका
न् त्यांची मनं वाहू शकत नाही तुम्ही?
साऱ्याच बाया खूप गप्प न् उदास होतात
तेव्हा
जेव्हा तुम्ही विणत असता
भविष्याचं रेशमी वस्त्र
न् शिजत घालता चुलीवर स्वप्नं
तेव्हा त्या उगाच थोड्याशा हसतात
रोदाननं बाईला विचारात
पडलेली दाखवली नाही कधी
न् व्हॅन गॉगनं तिला
गुडघ्यात मान टेकवून मरणासन्न बसलेली पाह्यली
शहरातल्या न् जगातल्या बायका
विचारात पडलेल्या असं चित्र
आवडणार नाही कुणालाच
त्या एकतर प्रियकराच्या बाहुपाशात असतात
किंवा व्हिनसची असहाय
हात तोडलेली नग्न सुंदरी असतात
ही चित्तं बदलण्याचा या
बायकांना हक्क दिला नाही कुणीच
न् अशामुळं बायका शहरातल्या
न् जगातल्या
हळूहळू अवकाशात जाऊ लागल्यात
तर बोलावू नका त्यांना परत हाक मारून
त्यांनी मागं वळून पाह्यलं
तर दगडाची मूर्त होऊन जाईल सारं शहरच!

## महानगर – ३९

या थंडगार शांततेमागं दडलंय् तरी काय?
पुरातन वाऱ्याचा गंध
सारीच माणसं एकाएकी वैराण सुन्न
न् बर्फागत तीक्ष्ण चमकणारी
मी मागं मागं सरकतेय्
पाठीला लागणारं स्वप्नांचं झाडं कदाचित
कदाचित भयचकित करणारा कडा असावा
किंवा—

जमिनीचं न् पाण्याचं भय मला कधीच वाटलं नाही
वाऱ्याचं न् वादळाचंही नाही
पण आता भीती वाटू लागलीय् माणसांची
आजकाल गावं वसत नाही पूर्वीसारखी
त्या घरातून हाक मारून कुणी
बोलतही नाही
पांढऱ्याशुभ्र प्रकाशात एक दहशत तळपत रहाते

कुठं आलेय् मी?
हे नगर अचानक एकदम परकं न् अनोळखी
जिभेत टाचणी खुपसून पडावं
तसं हे उरी सलत राह्यलेलं दुःख



खूप वर्षांपूर्वी त्या वळणावर भेटलं होतं तेच ते दुःख
आता थोडंफार बदललंय्
पण त्याला पाहताच तोच शहारा
तेच ते डोळ्यात सुया खुपसल्यागत येणारं पाणी
न् स्वतःची दया न् चीड येऊन भुळभुळ
वाहत जाऊन लोटून द्यावं
असं शरीर

प्रत्येक भावनेचा मी एक छोटासा पुतळा
करून ठेवू का इथं?
न् मग हात झटकत मी जाऊ शकेन निर्विकल्पपणे?

की मागं पाह्यल्यावर अनिवार आसक्तिनं
ते पुतळे पुनश्च जिवंत होतील
न् येतील माझ्याबरोबर

दूरवर पहाते मी डोळ्यावर हात घेऊन
कुणीच दिसत नाहीय्
मग ही मला जाळणारी आच कसली

असहाय बाया कमालीच्या सुंदर दिसतात म्हणे
न् इथं तर आरसापण नाहीय्
कुठायत् ती माझी लांब तीक्ष्ण नखं
कुठल्या मोहाच्या झाडावर लपवून ठेवल्यात कुणी?

## महानगर – ३९

बर्फातून हे गारढोण कोण हसतंय्
कुत्सित हसण्याचा स्वर थिजलेला घट्ट
मी माझ्या बोटांनी उकरत रहाते हसू
अचानक बोटांना धरून कितीतरी माणसं येतात भराभर
गोल धरून हसत खेळत रहातात भोवताली

शेकोटी पेटवली जाते
मी उभीच तलम ज्वाळेकडे पहात
यावर भाजून घेऊ का ही थोडीशी स्वप्नं
या सर्वांना पण देऊ शकू


असं म्हणत मी ठेवली स्वप्नं शेकोटीवर

तर सारेजण मोठ्याने खिदळत धावले
न् त्यांनी मलाच ठेवून दिलं
छानपैकी शेकोटीवर

आता सारच कसं उष्ण रंगीत धूसर उबदार
ही धगधग हवीहवीशी वाटतेय्
चाटतेय माझ्या नसा धमन्या त्वचा
केस जळाल्याचा खरपूस वास
एक ज्वाळा धडाडून धावली चेहऱ्याकडे
न् एक चुंबन घेतलं माझं
ते भाजत जाणारं रसरशीत चुंबन

मी त्वचेची कात टाकतेय्
डोळे होतात चकचकीत
आणि ज्वालाग्राही नजरेनं
मी पहात रहाते उष्णतेपल्याडचं जग

हसणारे-खेळवणारे अमोघ
आणि आता मूक झालेले त्यांचे चेहरे
मी हसत विरघळून जाते
छोट्याशा राखेच्या ढिगाकडे ती सारी पाठ फिरवून
जातात पुढं कुठं तरी
मी राखेच्या ठिणगीतून दबलेलं हसू हसत मुक्त.



## महानगर – ४०


सगळ्या आया गच्च काळजीत
आताशा लहान मुलंच जन्मत नव्हती
प्रश्नांच्या दुपट्ट्यात त्यांची शरीरं मावत नव्हती...
मुलं जन्मताच चालू लागत होती
एवढ्या ताबडतोब मोठ्या झालेल्या मुलांचं
नेमकं काय करावं
हे कुणालाच नव्हतं माहीत

झाडांचं एक बरं अस्तं
बोनसाय वगैरे करून त्यांना
लहानसं करून
लहानसं पाणी चिमूटभर मातीही पुरते
या मुलांचं काय?

सरतेशेवटी नाईलाजानं
सर्व गोष्टी दुर्लभ न् दुर्मिळ करण्यात आल्या

न् शाळेच्या किंवा तांदळाच्या
किंवा कुठल्याही शहरातल्या दुकानापुढे
रांग लावण्यासाठी ही मुलं निवडली गेली
आयांची गच्च काळजी सैलावली
न् शहर अखंड सौभाग्यवती रांगेत
चिरंतन उभंच.

## महानगर -४१



गारठून गेलेले शब्द पांघरलेली माणसं
सत्याच्या आरशातून माणसं
पलीकडं जाताना दिसतात
त्यामुळे आरसा न् दारं यातल फरकच
कळेनासा झालाय् हल्ली
अशात आजकाल
शरीरांवर चेहरे नसतात कुणाच्या
म्हंजे कोणतं माणूस कुठलं
हे कळेनासं होतं
त्यात दिमाखदार फसवणुकीचं राजबिंड हसू
कधी कधी माणसं नकळणं
हेच फायद्याचं असतय् शहरात
न् माणूस खूप कळू लागला
दुसऱ्या माणसाला
की त्या शहराची एक अस्सल
शोकांतिका होते अटळ
इथले रस्ते माहित नव्हते ते बरं होतं
हे उमगलं रस्ते माहित झाल्यावर
रस्त्यांना न् माणसांना
नाव ठेवताना आवश्यक असतं
की आपण आपलं नाव विसरायचं नाही
आपल्या स्वतंत्र दारातून
किंवा स्वतंत्र सत्यातून
आपण निखालस बिनचूक
परतायचं आपल्याच घरात
जिथं उतरवून ठेवलेला चेहरा
वाट पहात असतो आपली.

## महानगर ४२

समुद्र खूप शांत होता माझ्याआत तेव्हाची ही
निरामय शांततेतही
लपून राहू शकतं कुठलंही प्रकांड वादळ
समुद्र गप्प होता ओहोटलेला
आणि मी शिंपली शुभ्र वाळूत लपलेली
तोंड उघडून लाटेची वाट पहाणारी
माझ्यासाठी समुद्र होईल का कुणीतरी?
या शहरातली माणसं आताशा बोलत नाही
एक समजुतदार शांतता
माझ्या तळहातावर पाखरागत बसलेली
आणि माझे पाय तर विरघळू लागलेत वाळूत
दूर गेलेल्या क्षितिजाला जाऊन कोण सांगेल
की तुझ्यामाझ्यात हे सात समुद्र पसरलेत
माझ्याजवळ नाव नाही
न् शरीरासकट मी पोहत तिथवर यावं
असं तुला आवडणार नाही
सर्व शहरी शिष्टाचाराचे संकेत
मी वस्त्रागत भिरकावून दिलेले सूर
पहा, आज पुन्हा ते चढवतेय् अलंकारागत
पुन्हा म्हणू नकोस
यात तू दिसतच नाहीस म्हणून
मी गप्प होतेय्
मी कारणं शोधतेय अनेक
वाळूत लहान पोरानं शंख शोधावेत तसे
मी घाबरतेय् माझ्याच शब्दांना
त्यातल्या कुणीही काटे होऊ नये तुझ्यासाठी
माझं अस्तित्व कोरं राहील न् एकाकी
जोवर तू अंधाऱ्या रात्री क्षितिजावर
चंद्र पेटवत ठेवून साद घालशील
बोलवू नकोस हवं तर
किमान तू तिथं आहेस हेच खुपय मला.

## महानगर ४३

झाडांची पानं किलबिलतात
पाखरं भरतात रिकाम्या जागा घरट्यातल्या
कपडे भराभर धावू लागतात घरांकडे
घरात बसलेली माणसं वाट पहातात कपड्यांची
रात्रीचं झाकणं
लावलं जातं शहरावर
अजनबी वाऱ्यातलं संगीत
वाजू लागतं शहरात.
शरीर होतात ओठ
शरीर होतं शब्द
शहरातलं शरीर न् शरीरातलं शहर
उघडझाप करतं आवर्तात अनामिक
कोणत्या रंगाचं नाव घेऊ मी?
शहर शरीर न् रंग
यांचं गणित एकच येत नाहीय्
पण हे रंग त्रास देतात
न् सुख देतात माझ्या न् तुमच्या
डोळ्यांना
एवढंच खरंय्
दु:खाचा रंग असतो राखाडी
पण रंगांचं दु:ख रंगीत नसतं हे केवढं दु:खय्
खूप वर्षांपूर्वी शहरातले रंग
पडलेले वाळून खडखडीत
माणसांच्या रंगाला त्वचेला सुरकुत्या पडलेल्या
शहराच्या न् माणसांच्या चेहऱ्यावरून ब्रश फिरवून
आयुष्याला रंग येतच नव्हता
झाडं रस्ते जाहिराती बायांचे कपडे
बस टॅक्स्या इमारती
सारच रंगहीन

पाण्याला नसतो रंग पण किमान
तहान तरी भागते
या रंगहीन शहरानं तहान भागतच नव्हती
की भूक मिटत नव्हती.
मग एका कवीनं प्रेम केलं कवितेवर
शहरावर, माणसांवर
दु:खांवर
हळू हळू शहरावर रंग येत गेला
त्वचा तकाकू लागली
रस्ते लांब जिवणीनं हसले प्रसन्न निरभ्र
थकलेल्या बायका चुंबन घेऊ लागल्या गुलाबी कपड्यांचं
जाहिराती रंगीत फुग्यांसारख्या आभाळात सरसरल्या
काही झाल्या पतंग एक दुसऱ्यांना काटणाऱ्या
मारामाऱ्या झाल्या रंगीत चमचमीत
लाल हिरव्याशार
गाडीतून हिंडणारे न् पायी चालणारे पण
त्यांचं हसू झालं पिकलेलं रसरशीत
मंत्रालयाला सफरचंदाचा रंग आला
खुर्च्या झाल्या शरमेनं लालबुंद
शहरात रात्री पुरुषांच्या सुखानं
बायकांच्या दु:खाशी प्रणय केला रंगीत
सारं शहरच अनामिक रंगात रंगलेलं
न् हे पाहता पाहता
कवी हळू हळू उसवत गेला
बेरंग होऊन
फक्त त्यांचं पांढरशुभ्र हसू
शहराच्या एका कोपऱ्यात
जिवंत फडफडत राह्यलं
उडण्याच्या तयारीत.



## महानगर ४४

पेशी होतात आदिम नरभक्षक.
हाडांना येतात असंख्य डोळे
न् यातनेची गाज आपटत रहाते त्वचेवर
तू मलूल असहाय
भाबडे डोळे उचलून पहात होतीस
एकेका चेहऱ्याला
आणि सारेजण न्याहाळात होते तुला भयचकित
मरण रहायला आलेलं तुझ्यात
तो उग्र दर्प
ती कासाविशी
नर्सची निर्विकारता कोरी
तुझं एकटं मरण तू जगताना
माझं एकटं मरण मी जगताना
आज वाटतं मेली ती तू नव्हतीसच.



## महानगर ४५

लाकडाचं घट्ट टेबल
पांढराशुभ्र दरवळणारा प्रकाश
अज्ञानाच्या स्वच्छ चकचकीत खोलीत
मी बसलेले
कोरेपण सर्वांनाच मानवतं असं नाही
पण मला मानवलं असा भास होतो केव्हा केव्हा
खिडकीची चौकट खूप संवेदनाशील हळवी
दरवाजा?
नाहीय.
भिंतीमधून शब्दांचे नाद झिरपतात पाण्यासारखे मधून मधून
लाकडी वाशांवरून काळोखाची बोटं
सावली होऊन फिरतात
एका अद्भुततेत मी चिणली जातेय
असं वाटतं
तेव्हा खिडकी करकरते
न् शब्दांची एक नवी कोवळी पालवी डोकावते
शब्द खिडकीतून घरात येतात
हवा स्वच्छ पुसून काढतात
कंदिलाची काच पुसून लखलखीत करतात
टेबलावरची धूळ झटकून
माझी बोटं छानपैकी तासून तीक्ष्ण टोकदार करतात
भिंती थरथरतात किंचित
भिंतीमधून अर्थाचे धारदार खिळे येतात चकचकत क्रूर कठोरपणे
भिंती जवळ येऊ लागतात
अगदी सावकाश हळू हळू...
लाकडांवर टेबलावर एक
रक्ताची नक्षी उमटत जाते
एकांतिक आक्रोशाचा बंद नाद
अर्थांच्या खिळ्यांवरून पाझरतो
न् एक लहानसा कवी
अर्थांच्या वास्तविक सुळावर
बळी जातो बिलकूल आवाज न करता.



## महानगर ४६

कोलाहलाची वावटळ
नजरांचं गदळ गढूळ गढूळ
गच्च बेढब शब्दांची जनावरं
न् खूप कोरी न् काही गिचमिड माणसं
सारं काही मी एका पेटाऱ्यात भरलं
न् पेटी समुद्रात ढकलून आले
किनारा मांसल नग्न स्त्रीगत चमकतोय्
न् खूपशी मुलं पुन्हा नवीन नवीन
छोटी माणसं बांधत होती वाळूत
एक पांढरं पाखरू शब्दाचा एक दाणा घेऊन आलं
दुसरंही आलं
पुन्हा किनारा गजबजला
मी पण पुन्हा सरसावले किनारा सारवायला!

## महानगर ४७

आजकाल तिला आवडू लागलंय्
आरशातच रहायला
जो तो येतो न् तिच्यातच स्वत:ला पहातो
ही एक गंमत.



# महानगर ४८

खूप वर्षं माझ्या बरोबर चालून चालून
थकलेला कवी माझ्यात झोपून गेला दुखलेल्या मनासहित
नि:शब्दाच्या अंगणात
दु:खाच्या खडकाळ जमिनीवरून आम्ही रांगलो
न् थकून झोपलो एकमेकात
त्यानं डोळे उघडले तेव्हा
जग नव्यानं जन्मलेलं
कात टाकावी तसं दु:ख टाकून आम्ही पुन्हा रांगू लागलो कवितेत
कुणी सांगितलं कविता फक्त कागदावर लिहूनच वाचावी लागते
त्याचे डोळे होतात कविता
आर्त करुण खोल
हिरवागार स्पर्श मधूनच
कविता वाचायला मी हल्लीच शिकले नव्यानं
कदाचित माझ्याहीपेक्षा वेगानं तो
कविता लिहितोय् त्याच्या घायाळ नजरेनं माझ्या आयुष्यावर
तो अट्टाहासानं दूर ठेवतो मला
एखाद्यानं डोळ्यातल्या पाण्याला नाही म्हणावं तसं



चेखोव म्हणतात अगदी नेमकं तसंच
मीही झालेय रंगहीन कचऱ्याचा ढीग
मला खूप आवडायचं
स्वत:च्या भाषेत बोलायला
त्यांनी केलेत एवढे प्रयोग
न् छाटून छाटून एवढं छोटं केलं मला
की कोणतंच कलम होऊ शकत नाही यावर
तिरस्काराच्या जमिनीत रुजत नाही काहीच
उपरोध न् द्वेषाचा संपृक्त अर्थ उमजत नाही ज्यांना
अशांसाठी काय करावं?
एका भीषणतेत अलगद चिणले जात होते
आ: किती सहजपणे षंढ बनवलं गेलं मला
आता मी कोणते हिशेब तपासू
कोणकोणत्या गर्भपाताचं गाणं गाऊ?
या व्यवस्थेतले गर्भपात मोजून कंटाळलेय्
एक व्यवस्थाच फक्त जिवंत माणसाला संपवते असं नाही
प्रेमसुद्धा अस्खलितपणे संपवू शकतं आपल्याला
बेमालूम पुरावा न ठेवता.


## महानगर ४९

थकून गेलेय् मी...
रक्तानं लडबडलेले तुकडे उचलून थकून गेलेय् मी
हा तुटलेला पाय...
हे बोट...
अजून धडधडणारं हे छोटंसं लालभडक हृदय
हे फक्त एकच तुटलेलं पाऊल
अजून थरथरत पळू पहातंय् घराकडे
रक्ताची तहान लागलेला हा रस्ता
हा अमानुष काळा धूर
तुटलेली आतडी संभाळत चालणारी माणसं
हवेत तरंगणाऱ्या रेंगावत सुसाट येणाऱ्या गाड्या
न् एक प्रचंड ध्वस्त इमारत
मी सांगितलं तरीही
माझ्या जमिनीला कुणी वाचवू शकलं नाही की आत्म्याला
हरेक भावनेत
क्षणात
माणसात
आठवणीत
एक एक सुरुंग कसा ठासून भरलाय्
न् तरीही मी माझा स्वतःचा स्फोट न करता
चूपचाप विझावं ते कसं?
माणसं घाबरतायत् मला भेटायला
सर्वात जखमी माणूस भयानक असतो काय?
तो तर चालत असतो एका सुन्नाट अंताची वाट
ना मला कैफियत द्यायची



ना मला संघर्ष करायचाय्
प्रत्येक संघर्ष जन्म-मृत्यूहून निरर्थक असतो
असं खूप पूर्वीच कळलं मला
न् आता हे शहरभर झालेलं स्मशान बघून
मला अगदी थेट माझ्या मनाची आठवण झाली
चिंधड्या झालेल्या असंख्य अवयवाच्या ढिगाऱ्यातून
एका राखेशिवाय नाही होत काही निर्माण
न् शोधूनही या तुकड्या तुकड्यातून
मिळत नाहीय् मानवीयतेचा लहानसा तुकडा
जड अवजड सिमेंटी पहाडाखाली चिणली गेलेय् मी
या काळ्याभोर तप्त लोखंडी सळ्या
माझ्याच हरेक पेशीतून स्फोट झालेत
एक काळाभोर रस्ता
मी पांघरलेला शालीगत
न् खूपशा चुपचाप इमारती लखलखत
अंगावरल्या दागिन्यागत
न् अंगावर खेळावीत पोरं
तशी ही माणसं
अवघड अंग दुखायचं तरीही दयाळू मायाळू होत होती
ही नगरी कुणासाठी पण
जसं माझ्या डोळ्यात यायचं पाणी सहज
कुठल्यापण पाखरासाठी, माणसांसाठी
न् अचानक आवर्तन ज्वाळांची
रंग विसरून गेले त्यांचे रंग

सूरांचा अर्थ झाला आंधळा न् ओसाड
आणि दिशाहीन बेभान होत
मी होऊन गेले पूर्ण रिक्त शून्यवत
अवयवांच्या कुठल्या ढीगाला मी आपलं म्हणू?
नावानं हाक मारली तर
एक एक माणूस उठून येईल का यातनं?
ही माणसं कोणत्या हिस्र अनोळखी
मातीतून आलीयत्?
की ज्यांच्या जावळावरून हात फिरवताना आज माझा आत्मा
थरथर कापतोय्
शहरात रहातायत् भुकेल्या ज्वाळा
संशयाची भेसूर पिशाच्चं
जिभा चाटत लाळ घोटत रक्तपिपासू वर्तमान
अस्खलित कत्तल करतय्
शहरात फिरतायत् बेभान धडं
सारेच मेंदू ठेवल्यात फार्मोलिन चोपडून शोकेसमध्ये
शहरात आजकाल स्टँप मारलेली पोरं जन्मू लागलीयत्
ठार वेडा झालेला मृत्यू
हसत खिदळत हिंडतोय् राजरोस रस्त्यावरून
जीभ कापलेली असंख्य माणसं
याच शहरात रहातात
पोटात खचकन् तलवार खुपसूनपण
आतडी बाहेर येत नाही
एक काळीभोर शांतता न् एक खूप आदिम मेलेला माणूसच
बाहेर भळभळत येतो



बाया गर्भार रहायला घाबरू लागल्यात
रात्र असते दहशतीच्या टोकावर टोचलेलं मुंडकं
मी आठवत रहाते
मेल्यानंतर न् जन्मताना
माणसाचा नेमका धर्म असतो तरी कुठला?
न् या मधल्या वेळात माणूस जातो कुठे ?
आजकाल शहरात
माणसं रहात नाही
न् स्वत:ला कवी म्हणवायचा हट्ट
मी केव्हाच सोडून दिलाय्
आत्ताही मला वाटत नाही तीव्रतेनं
काही म्हणावसं
कारण ऐकणारे कानच उरले नाहीत या शहरात
नेमकं दु:ख कशाचं करावं हेच
उमजेनासं झालंय्
त्या असंख्य मेलेल्या माणसात
एक मी पण होतेच यावर हळू हळू विश्वास बसतोय्
न् माझ्या मुठीत
एक शुभ्र फडफडणारं अर्धमृत शहर!

## महानगर ५०

शब्द झालेत अनवाणी पावलं
माझं गर्भाशय मी कितव्यातरी झाडावर टांगून दिलेलं
न् वांझ पशू होऊन मी एकाकी चालू लागलेय्
निर्वाणीची वाट
जिथं माणसं नाहीत की नाद
प्रेमासारखं लहानसं तान्हं मूल
रूपांतरीत होतं मांस झडून गेलेल्या कवटीत
किंवा क्रूसावरचा येशूसुद्धा सुंदर वाटावा
इतकं भयाण वाटतं वास्तव
सगळीच माणसं त्याच्या तेराव्या शिष्यागत दिसू लागलीयत्
तेव्हाच मी उठून आले मैफलीतून
आता टाळ्या वाजवा की दगड मारा
ही निर्वात पोकळी कितीतरी अभेद्य
खूप लहानसं न् खूप असहाय झालो आपण
की सत्याचा एक भलामोठा रूंद पंजा
आपल्याला धरतो तळहातावर
न्याहाळून पहातो
न् करुण रडतो भेसूर श्वापदागत
ऐकलंय् कधी?
शहरातनं न् स्वत:तून हिंडताना
मी होते निर्भर
कधीच वाटलं नाही मला
की प्रेम हे एखाद्या हिंस्त्र पशूप्रमाणं झडप घालेल
किंवा रस्ता रोखून माझ्या आयुष्यावर नेम धरेल
किंवा दहशतीनं थंड घाम उमटवेल तप्तमुद्रेप्रमाणं शरीरावर कायमचा
किंवा हाडांचे फासे खुळखुळवत क्रूर हसेल

किंवा माझ्या नाजुक नसा लांबवर ताणून
छेडेल त्यावर यातनांचं अमोघ गाणे
ज्याचे सूर ऐकताना दिशांची काळीजं थरथरतील
किंवा व्यवहाराच्या मागावर खटखटा विणून
एक शरीर झाकणारं वस्त्र भिरकावून
मग बांधले जातील माझे डोळे
सारंच स्वाभाविक सहज सुंदर
कपट नसलेलं जग होतं
मी जगत होते त्यावेळची ही गोष्ट
प्रेमाच्या व्याख्या समोरासमोर ओरबाडून
हातपाय आपटत घेत होते
त्यावेळीही त्यातल्या उणिवांचे दगड मी जोरात भिरकावलेले
न् आज मी माझ्या स्वतंत्र जाणिवेचा दगड
जवळ ठेवून नकार देतेय् साऱ्यालाच
नकार किंवा कुणाचाही त्याग असतय् दुधारी शस्त्र
जे दुसऱ्या इतकंच आपल्यालाही कापत जातं बेमालूम
पण आज मला जाणवतंय्
हजारो वर्षामागं गुलाम बनून जगण्याऱ्यांची
स्वतंत्र आसक्ती कशी असते जालिम
की नशाच होऊन जाते तीही एक
आणि स्वतंत्र होण्याच्या हजारएक अर्थामागे
एक छोटासा गुलाम हात बांधून
केविल हसत असतो
न् मग रात्र झाली की तो लहानसा गुलाम
मग गोष्टी सांगतो इसापागत
न् मग हजारो जगण्याचे स्वतंत्र अर्थ

झुलत हसत मागेपुढे होत ऐकत रहातात
अर्धी रात्र झाली की मी उठते
हात बांधून चालू लागते निमूट चूपचाप
साखळदंड नसताना
निरखू लागते एक एक झाड क्षितीज
नवीन ठिकाणं नवी रास्ते नवी माणसं
जिथली माणसं खूप साध सरळ बोलू शकतील
क्रौर्याचं चिलखत घालून एक पाऊलही
चालता येणार नाही मला
त्यापेक्षा वांझोटं कटून मेलेलं काय वाईट?
एक गोजिरवाणं सफरचंद घेऊन
हजारो अर्थांपलिकडे खूप दूर
सूर्यापेक्षा जास्त प्रकाशमान
न् कुठल्याही सुळ्यांपेक्षा हिंस्र
प्रकाशाहून गतिमान चौखून बेभान पळत
ह्या अनादि अनंतात
मला शोधू द्या एक असं ठिकाणं
जिथं प्रेमाचा अर्थ असू शकेल इतका बाळबोध
पिल्लानं तोंड वासलेल्या लालसर कोवळ्या भुकेइतका सारे
न् घरटं बांधण्याचा त्रास
न् पिल्लं सारं विसरून एकटं उडायला सहज वाटावं
शरीराची मालकी किंवा कुणाबद्दलही आत्मियता न ठेवता
हलकेच दूर उठून जाता यावं
इतकं मोकळं होता यावं
प्रेमाच्या नावावर सोलून न काढता
कुठल्याही दुखावलेल्या पाखराला ज्याच्या आभाळात



सोडून देण्याएवढं सोपं असावं न् सहज
पण असं झालच नाही
न् प्रत्येक माणसाच्या डोळ्यातून मी
न् माझ्या डोळ्यातनं एकेक माणसं असहायपणे मरत गेली
आधी वाटलं की फुलायला थोडीशी माती देतील ते
न् मी रूतत गेले खोल खोल
डोळे विझत गेले
स्वप्नं आंधळी झालेली
न् माझ्या खळाळत्या हसण्याचा स्वर
मी प्रत्येक नदीला न् लहान पोरांना वाटून टाकला
व्हायलीनच्या प्रत्येक तारांवर मी माझे
स्वरतंतू तोडून ताणून बसवले
न् पाय वाळत टाकले कुठल्या कुठल्या गावच्या वलाण्यांवर
मला व्हायचं होतं नखशिखान्त प्रेम
व्हायचं होतं काळाभोर मेघ
व्हायचं होतं खूप चपळ तरतरीत तल्लख
कुठल्याही लहान मुलासारखं
एका अस्सल शब्दांप्रमाणं खणखणायचं होतं या शहरात
जादूनं बनवावं न् प्रेमानं हे सारं मला छोटसं छानसं
करायचं होतं
माणसासारखीच माणसं असावीत
जमिनीगत समृद्ध विशाल
तर मीच झाले कायमची अदृश्य न् शिवाय वांझ
शब्दांचे अनवाणी पाय
दिशा या अशा आंधळ्या न् बहिरे रस्ते

जाऊ द्या अशा गोष्टी पूर्वीही कधीतरी घडलेल्या
नुसतचं आवाज न करता एकलकोंडं बळी जायचं
वाईटच.
एखादं घुबड आरामात खात असेल
आपलं चामडं
कसे छान बळी चाल्लोयत आपण
कसे छान कोरे निरामय शोषले गेलोय आपण या दमनयंत्रणेकडून
भरजरी वस्त्र न मुकूट देऊन
त्यांनी सोललेलं एकटं शरीर
पहा कसं अवकाशात निवांत सोडून दिलय्
न मरता या जखमी देहाचं पोकळ यान
पहा कसं फिरेल स्वत:भोवती नि:श्रेम न् शुष्क होऊन निरर्थक
न् मग दुर्बिणी लावून बघतील ते निरर्थकपणातल्या जखमा
आता कळू लागलाय् निरर्थकतेचा अर्थ
न् हे विश्वंभर प्रश्नचिन्ह अस्तित्वाचं
गुरुत्वाकर्षणाची सोंगटी पुढं सरकवू नका कुणी
न् हे यांत्रिक खटकेही पुढं मागे खेचू नका
मागं परतून येण्याची बुद्धी वाटेतच मरून पडलीय्
एक अगदी कोरं कलेवर
उभय अभिशप्त
एखादं जिवंत जगणं चुकून
इथून जाताना दिसलचं
तर झडप घालीन म्हणते त्यावर...



## महानगर ५१


अचानक शरीरभर अंधार उदास
शहर निळजांभळ
सावळ्या ढगांना नजरांनीच मी टेकू लावले
वाटलं मुसळधार पाऊस कोसळेल बडबडत
तर माझ्या अंगावर ग्रीष्म कवडसे कोरून गेला
कवीपण तारण ठेवून पावसाला बोलवता आलं असतं तर...
घर... घराचं छप्पर... खांब
दारची केळ गप्प
फक्त एक निळा पक्षी पंख पसरून
अबोली उन्हाला चाटत होता पंखानं
अंगातलं रक्त काढून घ्यावं
तशी माणसं निघून गेली
न् पिवळ्याधमक माळरानावर एकट्या पक्क्या घरासारखी
मी उभीचय्
दार बंद खिडक्याही
एक व्रात्य उत्सुक वाऱ्याची झुळूक फटीतून चोरून पहातेय् माझं प्रेत
एका अस्तित्वानं दुसरं अस्तित्व बेमालूम कापता येतं
अस्तित्वाचा जन्म असतो भयावह
न् कवीचं मरणंही
एवढीच कविता लिहिली मी त्या संध्याकाळच्या कोवळ्या कागदावर
कवितांच काय रात्र झाली की
सूर्याबरोबर त्या बुडून जातात समुद्रात
आजकाल समुद्राचं पोट वाढलेलं दिसतय्
ते रोजरोज सूर्य न् माझ्या कविता खाऊनच
खूप वर्षांपूर्वी
एक पक्षी आकाश नांगरून गेला

त्यानंतर निळ्या शेतातल्या निळ्या फळात
एक माणूस फुलत होता
खूप वर्षापूर्वी
एक माणूस कविता नांगरून गेला
न् स्वप्नच स्वप्न उमलत गेली माणसांसकट
खूप वर्षापूर्वी
एका बाईनं नांगरलं स्वत:लाच न आभाळभर तेजस्वी दु:ख
फुललं
खूप वर्षापूर्वी
मी पण नांगरलं स्वत:ला
तर एक खूप थकलेला मृत्यू
कवितेचा हात धरून निघून गेला
न् लहानसं आयुष्य दुडदुडत राह्यलं
पावसाच्या हिंदोळ्यावर
न् मग वास्तविकतेचा हात धरून
ते मोठं झालं माझ्यापेक्षा
सावळ्या ढगानं डोळे मिचकावले
गर्रकन फिरून मी चांदण्यात विरून गेले
खूप खूप दुरून मी पाह्यलं
मग निळं स्वप्न
पाऊस ग्रीष्म कवडसे आयुष्य
अवकाशभर पावलं उमटवत
मी फिरले विश्वंभर अनादि अनंतात
श्रांत तृप्त निराकार!




## महानगर ५२

एकेका माणसातली एक घट्ट बंद खिडकी
खिडकीला नसतं कुलूपकिल्ली
ती आतूनच बंद केलेली असते कडी लावून
भयचकिताचा गंज पसरत असतो कडीवरून सर्वत्र
आणि खिडकी अधिकच घट्ट
ओठ मिटावेत कुणी
शब्दांचा एकही चुकार कवडसा निसटू नये म्हणून तसं
बाहेर जग वाढत असतं
दिवस उजाडून रात्र
ऊन आणि पाऊस
ग्रीष्म आणि वसंत येत-जात रहातात
खिडकीवर परिणामच होत नसतो
ना ताटी उघडत ना खिडकी



हळूहळू माणसं विसरतात खिडकीला
जगतात स्क्रू नटबोल्ट
किंवा श्वास टाकणारं यंत्र होऊन
मागतात एक विहीर
जिथून खूप दूर अस्तं आकाश
बनतात आदर्शांच्या फ्रेमस्
आणि कॉम्प्युटरसाठी एअरकण्डिशण्ड घरं
ज्यात नस्तात भविष्यातली वर्षं
माणसं रमतात आधिभौतिकात
कुठल्याही सत्तेत राहू शकतात
माणसं प्रश्न विचारत नाही कधी
की खिडकी कधी उघडायची
प्रश्नांच्या घनघोर अरण्यात
घर बांधतानाही ते एक कोपरा राखून ठेवतात
खिडकीसाठी
जी कायम बंद असेल
अंधाराच्या चौथ्या भितीत जगतानापण...!


The Vinayaka Temple here
catch fire. However, there have
The temple, which is well
90 per cent of wh
Sri Lanka.
Tamils from
The culprits behin
allegations of factio
(India Abroad News Se